ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष ३० पुणें, बुधवार, १८ नोव्हेंबर, १९६४ अंक १०

## विविध माहिती

**गोव्यांत लोकरीची गिरणी**—मध्यवर्ती सरकारनें गोव्यांत लोकरीचे धागे काढण्याची गिरणी काढण्यास मंजुरी देण्याचें ठरविलें आहे. ह्या गिरणींत ७०० चात्या बसविण्यांत येतील व ती खाजगी मालकीची असेल. गिरणीला लागणारा कच्चा माल आयात करण्यांत येणार नाहीं आणि तीमधील शक्य तितकी सर्व यंत्रसामग्री स्वदेशी बनावटीची वापरण्यांत येईल, अशा अटी परवाना देतांना घालण्यांत आल्या आहेत.

**कीनिआंत कापडाची गिरणी**—भारताच्या मदतीनें कीनिआंत सूत कातण्याची आणि कापड विणण्याची एक गिरणी काढण्यांत येणार आहे. गिरणींत २४ हजार चात्या आणि ६०० माग बसविण्यांत येणार आहेत. प्रारंभीं ह्या गिरणींत ६ हजार चात्या आणि १५० माग काम करूं लागतील. आर. एम्. गोकुळदास अँड कंपनीला गिरणी काढण्यास उभयता देशांच्या सरकारांनीं संमति दिली आहे.

**नेपाळला भारताचें कर्ज**—भारतानें नेपाळला १ कोटी रुपयांचें कर्ज देण्याचें कबूल केलें होतें. त्याप्रमाणें कर्जाच्या करारावर उभयतां देशांच्या प्रतिनिधींनीं सह्या केल्या आहेत. कर्जाची मुदत १५ वर्षांची असून त्यावर दरसाल दर शेंकडा ३ टक्के व्याज आकारण्यांत येणार आहे. कर्जाचा उपयोग करून नेपाळमध्यें अनेक उद्योगधंदे काढण्यांत येणार आहेत. त्यांत ताग, सिमेंट, कागद आणि कापड हा माल तयार करणाऱ्या कारखान्यांचा समावेश आहे.

**स्वीडनकडून आर्थिक साह्य**—स्वीडन आणि भारत ह्यांच्या दरम्यान आर्थिक साह्याचा करार करण्यांत आला आहे. कराराप्रमाणें स्वीडन भारताला ३·६ कोटी क्रोनर कर्ज देणार आहे. त्यापैकी १·२ कोटी क्रोनरचा माल मदत म्हणून देण्यांत येणार असून २·४ कोटी क्रोनर विकासासाठी कर्ज म्हणून देण्यांत येणार आहे. मदत म्हणून देण्यांत येणाऱ्या मालांत ८,०००टन कागदाचा समावेश आहे. प्राथमिक शिक्षणासाठी लागणारीं पाठ्य-पुस्तकें छापण्यासाठी हा कागद देण्यांत येत आहे. स्वीडनकडून भारताला ह्या कामासाठी मिळालेली ही तिसरी मोठी देणगी आहे.

**अफगाणिस्थानची नवी घटना**—अफगाणिस्थानच्या पार्लमेंटनें नव्या घटनेचा अंगीकार केला आहे. नव्या घटनेंतील तरतुदीप्रमाणें अफगाणिस्तानच्या राजघराण्यांतील कोणत्याहि व्यक्तीला राजकीय पक्षांचे सभासद होतां येणार नाहीं. त्याशिवाय पख्तुनिस्तानच्या लोकांना स्वयंनिर्णयाचा हक्कहि देण्यांत आला आहे. पख्तुनिस्तान पाकिस्तानच्या सरहद्दीवर असून त्यांत ४० लाख पठाणांची वस्ती आहे.

**सिने कलावंतांसाठी फंड कशाला?**—दक्षिण भारतामधील एका चित्रपटनिर्मात्यानें सिनेकलावंतांच्या स्वास्थ्यासाठी एक फंड उभारण्याविषयीं एक बिल राज्यसभेंत प्रविष्ट केलें होतें. दक्षिण भारतीय फिल्म चेंबर ऑफ कॉमर्सनेंहि ह्या प्रश्नाचा विचार चालविला होता. परंतु भारत सरकारच्या माहिती आणि नभोवाणी खात्याच्या मतानें अशा फंडाची कांहीं आवश्यकता नाहीं. बहुतेक सिनेकलावंतांना वेतनाच्या रूपानें चांगली प्राप्ति होत असल्यानें, त्यांच्या हिताची व स्वास्थ्याची काळजी करण्याचें कारण नाहीं असा अभिप्राय व्यक्त करण्यांत आला.

**आयुर्विमा कॉर्पोरेशनचा उपक्रम**—खाजगी भांडवलाच्या कंपन्या आणि सहकारी संस्था ह्यांनीं औद्योगिक वसाहती स्थापन करण्याच्या कामीं पुढाकार घेतल्यास त्यांना द्रव्यसाहाय्य देण्याची तयारी आयुर्विमा कार्पोरेशननें दाखविली आहे. द्रव्यसाहाय्य देण्याची पद्धत ठरविण्यांत आली असून त्यासंबंधींची माहिती राज्य सरकारांना पुरविण्यांत आली आहे. ९ राज्यांनीं ह्या योजनेचा फायदा घेण्याची तयारी दाखविली आहे. त्यांपैकीं ६ राज्यांचे अर्ज मंजूर करण्यांत आले आहेत.

**संपादकाचा सल्ला**—भारतांत अमेरिकेच्या मालकीचे ३३·१ कोटी डॉलर्स किंमतीचे रुपये असून ते सध्यां निकामी पडून आहेत. हीं सर्व रक्कम संततिनियमनाचा प्रसार करण्याच्या कामासाठी खुली करण्यांत यावी असा सल्ला 'हार्पर्स मॅगेझीन' ह्या नियतकालिकाच्या संपादकानें दिला आहे. आशिआंत चिनी तऱ्हेचा कम्युनिझम यावयास नको असेल तर त्यासाठी दुसरी कोणती अधिक चांगली गोष्ट करतां येईल ? असा त्याचा सवाल आहे.

**ताजमहाल एक्सप्रेस गाडी**—ताजमहाल, आग्रा येथील किल्ला आणि फत्तेपूर शिक्री हीं तीन सौंदर्यस्थळें दूर दूर अंतरावर असल्यामुळें हौशी प्रवाश्यांना ती पहाण्यासाठी बराच वेळ घालवावा लागतो. सर्व ठिकाणें एका दिवसांत पाहून होणें तर अशक्यच होतें. प्रवाश्यांची होणारी ही गैरसोय दूर करण्यासाठी एक खास आगगाडी बांधण्यांत आली आहे. ह्या गाडीचा रंग निळा आणि पांढरा असून ती बांधण्यासाठी २४ लाख रुपये खर्च आला आहे. गाडीला दहा डबे असून त्यांत ४६७ प्रवाश्यांची सोय करण्यांत आलेली आहे. गाडीचा पहिला चांचणीचा प्रवास नुकताच झाला. आतां ती रीतसर सुरू करण्यांत आली आहे. ही गाडी दिल्ली आणि आग्रा ह्या स्टेशनांच्या दरम्यान धावणार आहे. भारतांत येणाऱ्या परदेशीय प्रवाश्यांचीं वेगानें धांवणाऱ्या ह्या गाडीमुळें चांगली सोय होणार आहे.

**घरे बांधण्यासाठी बांबूचा उपयोग**—मध्यवर्ती सरकारच्या बांधकाम खात्यानें स्वस्त आणि टिकाऊ घरें बांधण्यासाठी बांबूंचा उपयोग कसा करतां येईल, ह्यासंबंधी माहिती देणारी एक पुस्तिका काढली आहे. बांबूवर कांहीं प्रक्रिया न करतां त्याचा बांधकामांत उपयोग करण्यांत आला तर तो दोन किंवा तीन वर्षांपेक्षां अधिक टिकत नाहीं. प्रक्रिया केलेला बांबू मात्र १५ ते २० वर्षे टिकतो, असा अनुभव आहे.

**अन्नाबाबतचा चोखंदळपणा**—ब्रिटनमधील एका अन्न-विशारदानें असा अभिप्राय व्यक्त केला आहे कीं, जे लोक विशिष्ट प्रकारचेच अन्नपदार्थ खाण्याचा आग्रह धरतात, त्यांच्यामुळेंच जगांतील अन्नाचा प्रश्न बिकट होण्यास मदत झालेली आहे. अन्नाचा प्रश्न सोडवावयाचा असेल तर लोकांनीं जरूर पडल्यास कृत्रिम अन्नपदार्थ खाण्याचीहि तयारी ठेविली पाहिजे. बहुतेक लोक लहानपणापासून जडलेल्या अन्नविषयक संवयींना निष्कारण चिकटून बसतात.

**नर्गीसविरुद्ध निदर्शनें**—अलाहाबाद येथील प्रयाग संगीत समिति ह्या संघटनेनें चित्रतारका नर्गीस ह्यांच्या हस्तें स्नातकांना प्रमाणपत्रें देण्याचें योजलें होतें. समितीच्या ह्या निर्णयाविरुद्ध दोन हजार निदर्शकांनीं घोषणा देत मिरवणूक काढली. अश्लील चित्र-पट व जाहिराती ह्यांच्याविरुद्ध प्रचार करणाऱ्या संघटनेतर्फे मिरवणूक काढण्यांत आली होती. श्रीमती नर्गीस ह्यांना अभिजात संगीताचें ज्ञान नसल्यामुळें त्यांच्या हस्तें दीक्षान्त समारंभ होणें निदर्शकांना पसंत नव्हतें.

**ऑस्ट्रेलिआनें मदत वाढविली**—पाकिस्तानांतील सिंधु नदीच्या खोऱ्याचा विकास करण्यासाठी देण्यांत येणाऱ्या मदतींत ऑस्ट्रेलिआनें वाढ केली आहे. ऑस्ट्रेलिआ आतां ४६ लाख ऑस्ट्रेलिअन पौंड अधिक देणार आहे. रुपयाच्या चलनांत जादा मदतीची रक्कम सुमारें ५ कोटी रुपये होते.

**साखरेच्या उत्पादनावरील निर्बंध**—इंडिअन शुगर मिल्स असोसिएशन कलकत्ता, ह्या संघटनेने कांहीं दर्जाच्या साखरेच्या उत्पादनावर सरकारनें घातलेल्या बंधनाबद्दल चिंता व्यक्त केली आहे. 'अ' व 'ब' प्रकारच्या साखरेचें उत्पादन करण्यावर सरकारनें बंदी घातली आहे. सरकारचा हुकूम पाळण्यासाठी कारखान्यांना यंत्रसामग्रींत बदल करावा लागेल व त्यासाठी किमान दोन वर्षांचा काळ लागेल असें कारखान्यांचें म्हणणें आहे.

**अणुबाँबच्या स्फोटाचा परिणाम**—चीननें सिकिआंग प्रांतांत केलेल्या अणुबाँबच्या प्रायोगिक स्फोटाचा एक अनपेक्षित परिणाम होण्याचा संभव आहे. स्फोटामुळें होणाऱ्या जबरदस्त वायुलहरींचा परिणाम होऊन उत्तर थायलंडमधील एक सुप्त ज्वालामुखी जागृत होण्याचा धोका उत्पन्न झाला आहे. हा ज्वालामुखी गेलीं साठ वर्षें निद्रिस्त आहे.

**जमिनीचा कस वाढविण्यासाठी प्रयोग**—लखदीव बेटांतील २००० टन वाळू केरळमधील कांहीं शेतकऱ्यांना पुरविण्यांत येणार आहे. केरळमधील जमिनीचा कस वाढविण्यासाठी जरूर असणारी रासायनिक द्रव्यें ह्या वाळूंत आहेत असें आढळून आलें आहे. प्रयोग यशस्वी झाल्यास दरसाल हजारों टन वाळू लखदीव बेटांतून केरळमध्यें आयात करण्यांत येईल.

**ह्याचा अर्थ काय?**—रशिअन क्रांतीच्या ४७ व्या वाढ-दिवसानिमित्त चीनचे पंतप्रधान चौ-एन-लाय मास्कोला गेले होते. त्या वेळीं त्यांनीं नव्या सोव्हिएट पुढाऱ्यांचें हार्दिक अभिनंदन केलें. मात्र त्याच वेळीं पेकिंग रेडिओवरून रशिआनें सिकिआँग प्रांतावर नजर ठेवूं नये असा अप्रत्यक्ष इषारा देण्यांत आला.


तुमचा "पगाराचा दिवस" हा
तुमचा "बचत दिन" हि आहे!

एकदा तुम्ही खर्चायला प्रारंभ केला, कीं तुमचे पैसे इतक्या लवकर संपतील की तुम्ही बचतीचा विचार पुढच्या महिन्यावर ढकलाल (असें होत होत तो पुढील महिना कधींच यावयाचा नाहीं!)

तेव्हां, तुमच्या पगाराच्या दिवशींच आमच्या कोणत्याहि शाखेंत तडक या, आणि आपल्या उत्पन्नाचा कांहीं भाग बाजूला काढून बचत करा.

दि बेळगांव बँक लिमिटेड

स्थापना : १९३० : शेड्यूल्ड बँक

रजिस्टर्ड ऑफिस : रविवार पेठ, बेळगांव

*म्हैसूर आणि महाराष्ट्रभर ३३ शाखा*

ठेवींची रक्कम : रु. २ कोटी, ४७ लक्षांवर

४



स्वस्तिकचा माल निर्यात होऊं लागला

—: कांहीं बोलके आंकडे :—

| | |
|---|---|
| १९६३ सालांतील मालाची विक्री | रु. १ कोटी, २ लक्ष |
| १९६३ अखेर वसूल भाग-भांडवल | रु. ४३,८१,४८५ |
| कामगारांची संख्या | १,१०० चे वर |
| कारखान्याच्या बांधलेल्या जागेचें क्षेत्रफळ | १,२०,००० चौ. फू. |

— प्रमुख उत्पादनें —

गमबूट्स—होजपाईप्स—प्रेशर होजेस

ग्लोव्हज—इरेझर्स—ऑईल सील्स

व

स्वरूप केबल्स

स्वस्तिक रबर प्रॉडक्ट्स लि.

स्वस्तिक गृह, खडकी, पुणें ३.

(टेलिफोन नं. : ५५२०१)

# अर्थ

बुधवार, १८ नोव्हेंबर, १९६४





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## स्वयंचलित यंत्रांचा वाढता वापर
### अमेरिकेंत ६० लाख कामगार बेकार

अमेरिकेंतील समृद्धि आतां शिगेला पोंचली आहे. देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नानें उच्चांक गांठलेला आहे. किंमती स्थिर असल्या तरी व्यवहारांत असलेल्या चलनाची मात्र वाढ झालेली आहे. व्यक्तिगत उत्पन्नांतहि खूप वाढ झालेली आहे. अमेरिकेंत ज्याला खालचा मध्यमवर्ग म्हणतात त्या वर्गांतहि दोन घरें व तीन मोटारी असलेलीं कुटुंबें कितीतरी आढळतात. न्यूयॉर्क शहराच्या झगझगाटांत नाइट क्लबांत प्रवेश मिळविण्यासाठी सायंकाळचा पोशाख केलेल्या स्त्री-पुरुषांच्या रांगा दिसून येतात. कंपन्यांचे नफे १९६३ शीं तुलना करतां २२ टक्क्यांनीं वाढले आहेत; कांहींचे तर ३० अगर ५० टक्क्यांनीं वाढले आहेत. करांत कपात करण्यांत आल्यामुळें कॉर्पोरेशन्सच्या नफ्यांत १५० कोटी डॉलर्सची भर पडली आहे. शिकॅगो येथील फर्स्ट नॅशनल बँकेनें ८०० व्यापारी बँकांच्या अधिकाऱ्यांचीं भावी आर्थिक घडामोडींविषयीं मतें अजमावलीं असतां असें आढळून आलें कीं, ३८० अधिकाऱ्यांनीं परिस्थिति भरभराटीची होईल असा होरा वर्तविला; फक्त ९ जणांनीं परिस्थिति बिघडेल असें मत व्यक्त केलें.

### चलतीची दुसरी बाजू

पण, हा देखावा वाटतो तसा रम्य नाहीं. खुद्द सरकारच्याच माहितीप्रमाणें ४ कोटी अमेरिकन नागरिक म्हणजे एकपंचमांश लोक दारिद्र्यापेक्षाहि खालच्या पातळीवर जगत आहेत. कांहीं अर्थशास्त्रज्ञांच्या व कामगार पुढाऱ्यांच्या मतानें तर दोन-पंचमांश लोक ह्या अवस्थेंत राहात आहेत. इतर कोठल्याहि प्रगत औद्योगिक देशांपेक्षा अमेरिकेंत बेकारी अधिक आहे. युद्धानंतर ती वाढतच चाललेली दिसून येते. ह्या बाबतींतले आंकडे अधिक बोलके आहेत.

| वर्ष | बेकारीची टक्केवारी |
|---|---|
| १९४८–४९ | २·६ |
| १९५३–५४ | ३·९ |
| १९५७–५८ | ५·० |
| १९६०–६१ | ५·३ |

गेल्या वर्षी बेकारी ६·१ टक्के झाली. त्यानंतर तेजीचा काळ आल्यामुळें ती थोडी कमी झाली. परंतु हा काळ ओसरल्यावर बेकारी ७ टक्के किंवा अधिक होईल असें मानण्यास पुरेसा पुरावा उपलब्ध आहे. एका कामगार पुढाऱ्याच्या मतानें तर बेकारी १० टक्क्यांपर्यंतहि वाढण्याची शक्यता आहे. बेकारांचा प्रत्यक्ष आंकडा काढणें कठीण आहे. कारण, ज्या कामगारांचा बेकारीचा विमा असतो त्यांचीच फक्त नोंद केलेली असते. त्यामुळें अनेक धंद्यांतल्या न नोंदलेल्या बेकारांच्या अस्तित्वाची खूणसुद्धां दिसत नाहीं. बेकारीची पातळी खूप वाढलेली असल्यामुळें पुष्कळ कामगारांनीं रोजगार शोधण्याचेंच सोडून दिलें आहे. अशा रीतीनें सुमारें १५ लाख कामगार मजुरांच्या बाजारांतून नाहींसे झाले आहेत. बेकारांची संख्या सुमारें ६० लाख तरी असावी. मोठ्या प्रमाणावरील बेकारी ही सध्यांच्या अर्थव्यवस्थेचा एक अनिवार्य भागच आहे अशी अमेरिकन लोकांची समजूत करण्याचे प्रयत्न अमेरिकेंतील बड्या भांडवलदारांतर्फे सुरू होणार आहेत.

### आर्थिक प्रगतीचा मंद वेग

अमेरिकन अर्थव्यवस्थेच्या विकासाचा वेग मंदावल्यामुळें ही बेकारी माजलेली आहे. दरसाल ७ लाख नवे रोजगार उपलब्ध करण्याची आवश्यकता असतांना फक्त १ लाख, ७५ हजार रोजगारच उपलब्ध होत आहेत. पण स्वयंचलित यंत्रांचा वापर हें बेकारीचें सर्वांत महत्त्वाचें कारण आहे. गेल्या एप्रिलमध्यें प्रसिद्ध करण्यांत आलेल्या सिनेटच्या एका उपसमितीच्या अहवालांत नमूद केल्याप्रमाणें शास्त्रीय आणि तांत्रिक क्रांतीमुळें अमेरिकन समाजाच्या आर्थिक व सामाजिक पायालाच हादरा बसलेला आहे. स्वयंचलित यंत्रांचा वापर फक्त उद्योगधंद्यांपुरताच मर्यादित राहिलेला नाहीं. शेतीच्या व्यवसायांत ही आपत्ति फार मोठ्या प्रमाणावर कोसळलेली आहे. गेल्या महायुद्धापासूनच्या १५ वर्षांत अमेरिकेंतील शेतीच्या उत्पादनांत १३५ टक्के वाढ झालेली आहे. इतर कोणत्याहि धंद्यांत इतकी वाढ झालेली नाहीं. ह्या काळांत शेतीच्या व्यवसायांतील ४० टक्के कामगार निरुपयोगी म्हणून वगळले गेले आहेत. त्यांची जागा राक्षसासारख्या प्रचंड यंत्रांनीं घेतली आहे. दरसाल माणसाच्या हाताचा उपयोग निकामी करणारीं नवीं यंत्रें शेतींत येत आहेत. ह्या यंत्रांमुळें बेकार झालेल्यांना पुन्हा कधीं रोजगार मिळतच नाहीं. एक तर हे कामगार अर्धकुशल असतात. त्यांना शेतीच्या व्यवसायांतील कामेंच फक्त करतां येतात. शेतींतच काय पण इतर क्षेत्रांतहि स्वयंचलित यंत्रांमुळें ज्या लोकांना पर्यायी काम करतां येणार नाहीं असेच लोक नेमके बाहेर फेंकले जातात. त्यांना जें काम येतें तेंच काम टिपून नाहींसें करण्यांत येतें. अशा लोकांना पुन्हा नव्या रोजगाराचें शिक्षण देण्याची सोय नसणें, ही अमेरिकन अर्थव्यवस्थेंतील सर्वांत मोठी राष्ट्रीय उणीव आहे.

---

## पेकिंगमध्यें ब्रिटनचे औद्योगिक प्रदर्शन

ह्या महिन्याच्या दोन तारखेपासून चौदा तारखेपर्यंत पेकिंग येथें ब्रिटननें एक औद्योगिक प्रदर्शन भरविलें होतें. चीनमध्यें कम्युनिस्टांची सत्ता प्रस्थापित झाल्यापासून पश्चिम युरोपांतील औद्योगिक दृष्ट्या पुढारलेल्या देशानें भरविलेलें चीनमधील हें सर्वांत मोठें प्रदर्शन आहे. ह्या प्रदर्शनांत २०० पेक्षा अधिक ब्रिटिश कंपन्यांनीं भाग घेतला होता. प्रदर्शनाच्या उद्घाटनाच्या वेळीं ब्रिटनमधील ३५० उद्योगपति हजर होते. ब्रिटिश बोर्ड ऑफ ट्रेडचे अध्यक्ष मि. डगलस जे. हे मुद्दाम हजर राहिले होते. ब्रिटनच्या उद्योगधंद्याच्या क्षेत्रांतील अनेक प्रमुख व्यक्तींना चीनशीं व्यापार वाढविण्याची तीव्र इच्छा आहे. मजूर व हुजूर पक्षांत राजकीय मतभेद असले, तरी चीनशीं होणारा व्यापार वाढविण्याबाबत उभयतांत एकमत असल्याचें दिसून येतें. अर्थात् सर्वच लोक ह्या धोरणाचा पुरस्कार करतात असें नव्हे.

## वैकुंठभाई : सुधारक आणि व्यक्ति

श्री. वैकुंठभाई मंत्रिपदावर असतांना नेमण्यांत आलेल्या अनेक कमिट्यांवर मी काम केलें आहे, परंतु आम्हीं दोघेहि ज्या कमिटींत सभासद होतों, अशी एकच कमिटी; ती म्हणजे जून, १९५५ मध्यें प्लॅनिंग कमिशननें नेमलेली स्मॉल स्केल अँड व्हिलेज इंडस्ट्रीज कमिटी होय. ह्या कमिटीची पूर्वपीठिका, कामकाज आणि शिफारसी श्री. वैकुंठभाईंचें व्यक्तिमत्व आणि दृष्टिकोण ह्यांवर बराच प्रकाश टाकतात.

चेअरमनच्या नांवावरून पुढें ही कमिटी कर्वे कमिटी ह्या नांवानें ओळखली जाऊं लागली. प्लॅनिंग कमिशनचे चेअरमन माजी पंतप्रधान नेहरू ह्यांचेपुढें कमिटीच्या सभासदांच्या नेमणुकीचा प्रश्न आला, तेव्हां त्या त्या विभागांतील व्हिलेज आणि स्मॉल इंडस्ट्रीज बोर्डांचे चेअरमन यादींतून वगळले होते. परंतु अशा कमिटींत श्री. वैकुंठभाई नसणें पंतप्रधानांना मुळींच पटलें नाहीं. श्री. वैकुंठभाईंना कमिटीवर घेतले, तर खादी अँड व्हिलेज इंडस्ट्रीज बोर्डाचे ते चेअरमन असल्यामुळें त्या बोर्डाला खास प्रतिनिधित्व दिलें आहे, असा अर्थ लावला जाण्याचा दाट संभव आहे असें पंतप्रधानांना सांगण्यांत आलें. "कोणत्याहि बोर्डापेक्षा वैकुंठभाईंचा अनुभव अधिक व्यापक आणि दीर्घ आहे. मला वैकुंठभाई म्हणून ते हवेत. ते कुठल्या विशिष्ट संस्थेशीं संबंधित आहेत म्हणून नव्हे. वैकुंठभाईंच्या बाबतींत ही गोष्ट स्फटिकासारखी स्पष्ट आहे. त्यामुळें त्यांच्या नेमणुकीनें कुठेंहि गैरसमज होण्याचें कारण नाहीं." असें पंतप्रधानांनीं त्या हरकतीला चोख उत्तर दिलें.

कमिटीच्या चर्चेत आणि कार्यांत वैकुंठभाईंची कामगिरी वैशिष्ट्यपूर्ण अशी झाली. त्यांच्या इतर अनेक उत्कृष्ट गुणांतहि त्यांची मानवता आणि विवेकता प्राधान्येंकरून दिसून आली. गरीब आणि दुर्बळ लोकांच्याबद्दल त्यांना अमाप सहानुभूति वाटे. परंतु, त्याबरोबरच, ज्ञानाचा प्रसार आणि कार्यक्षमता ह्यांत वाढ झाली तरच सर्वांना अधिक चांगलें जीवन जगायला मिळूं शकेल, हें पटण्याइतके ते बुद्धिवादीहि होते. द्रुत गतीनें प्रगत होणाऱ्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय आर्थिक जीवनाचा एक आवश्यक भाग म्हणून खेडेगांवांतून औद्योगिक प्रगति घडवून आणली पाहिजे, असा त्यांचा खेडेगांवीं उद्योगधंद्यांबाबत दृष्टिकोण होता. जॉइंट स्टॉक किंवा सरकारी खात्यांनीं नियंत्रित केलेल्या उद्योगापेक्षा, उत्पादनाची समान रूपरेषा, रोजगार न बुडतां परंपरागत उद्योगांतून तांत्रिक सुधारणांचा तातडीनें वापर, सहकारी संघटना, ह्यांनीच खेडेगांवांची सुधारणा घडवून आणण्यावर त्यांचा भर होता; त्यामुळें, पुनर्घटित आणि प्रगतिपर खेडेगांवीं अर्थरचना राष्ट्रीय अर्थरचनेचा सर्वांत मजबूत भाग बनेल, सर्वांत कमजोर भाग नव्हे.

वैकुंठभाईंची भावना आणि बुद्धिनिष्ठा भक्कम पायावर आधारित होती; अर्धवट किंवा तात्कालिक कारणांनीं ते त्यावर परिणाम होऊं देत नसत. ते मूलतः इतके सज्जन आणि सहकार्यास तयार असत, कीं त्यांच्या ध्येयाला एखादी गोष्ट व्यावहारिक दृष्ट्या पोषक आहे असें त्यांना वाटलें तर ते त्या बाबींत आपल्या सहकाऱ्यांना मनापासून पाठिंबा देत; मग इतर कितीहि बाबतींत सहकाऱ्यांशी मतभेद असेनात. ज्यांच्यांत आणि वैकुंठभाईंत महत्त्वाच्या बाबतींत मुळींच एकवाक्यता नाहीं, अशांशीहि ते घनिष्ठ संबंध राखतांना दिसले, म्हणजे त्यांच्या निकटच्या स्नेह्यांनाहि आश्चर्य वाटे. वैकुंठभाई कोणत्याच प्रकारची 'अस्पृश्यता' मानीत नसत, हें त्यांचें रहस्य आहे.

— वि. गो. कर्वे

## किर्लोस्करांनीं घडविलेली औद्योगिक क्रांति

### शंतनुरावांच्या आघाडीचा 'टाइम' नें केलेला गौरव

"टाइम" ह्या जगप्रसिद्ध अमेरिकन साप्ताहिकाच्या ताज्या १२ नोव्हेंबरच्या अंकांत, किर्लोस्कर घराणें व त्यांतील शंतनुराव, ह्यांची गौरवपर माहिती देण्यांत आली आहे. "जगांतील सर्व खंडांतील एकूण ४२ देशांत, किर्लोस्कर समूह दरवर्षी सात प्रचंड कंपन्यांची सुमारें २२ कोटी रुपयांचीं शेतीचीं व औद्योगिक यंत्रें विकत असतो. त्यांचे प्रमुख शंतनु लक्ष्मण किर्लोस्कर हे मॅसेच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे १९२६ सालचे पदवीधर आहेत. त्यांनीं आपल्या घराण्याच्या कंपनीच्या उत्पादनांत सुधारणा आणि विविधता घडवून आणून त्यांस आधुनिक केलें. विदेशी कारखानदारांचें सहकार्य मिळवून त्यांनीं ह्या दिशेनें प्रगति चालूच ठेवली. ठिकठिकाणीं पसरलेले नऊ कारखाने आणि त्यांतील ११,००० कामगार मोठ्या कौशल्यानें चालवितांना ते आपल्या अधिकाराचा वापर अप्रत्यक्ष करतात. सर्व कांहीं ठीक चाललें असेल, तर ते त्यांत हस्तक्षेप करीत नाहींत. आपल्या खासगी ट्विनएंजिन बीचक्राफ्टमधून उड्डाण करीत ते सर्व कारखान्यांशीं संबंध राखतात.

"किर्लोस्कर कंपन्या आपल्या उत्पादन क्षेत्रांत केवळ भारतांतच अग्रेसर आहेत असें नाहीं. (त्या भारतांतील डिझेल इंजिनांपैकीं ६५% एंजिनें, ४०% सेंट्रिफ्युगल पंप, २६% इलेक्ट्रिक मोटर्स तयार करतात); भारत हा केवळ कच्च्या मालाची निर्यात करणारा देश आहे, ही त्याची अपकीर्ति ते धुऊन काढीत आहेत. किर्लोस्करांच्या डिझेल्सपैकीं २०% परदेशीं खपतात; पश्चिम जर्मनी ते कॅलिफोर्निया आणि वेस्ट इंडिज तें इराणचें आखात येथें त्यांना खप आहे. एअर कॉम्प्रेसर्स तें व्हर्टिकल टरेट लेथ, स्लूस व्हॉल्व्हज तें टॉर्क कनव्हर्टर्स, अशी त्यांच्या उत्पादनाची कक्षा आहे. परंतु किर्लोस्करांना सर्वांत मोठा अभिमान वाटतो, तो त्यांनीं घडवून आणलेल्या शेतीच्या पद्धतीमधील सुधारणेबद्दल. लाकडी नांगराऐवजीं लोखंडी नांगर शेतकऱ्यांनीं वापरावे ह्यासाठी त्यांनीं केलेले प्रयत्न, बैलांच्या ऐवजीं डिझेल एंजिनें वापरून शेतीसाठी पाणी खेचण्यास शेतकऱ्यांना त्यांनीं केलेलें प्रवृत्त, ह्या त्यांच्या मूलभूत महत्त्वाच्या कामगिऱ्या आहेत.

"हिंदी उद्योगपतींच्या घराण्यांपैकीं हेंच एक घराणें असें आहे कीं ज्यांच्या कापडाच्या गिरण्या नाहींत. ह्या घराण्याचे संस्थापक, शंतनुरावांचे दिवंगत वडील, हे मुंबईला शिक्षक होते; सायकली दुरुस्त करून आणि नांगर तयार करून ६० वर्षांपूर्वीं त्यांनीं ह्या क्रांतिकारक प्रगतीचा पाया घातला. पहिले सहा नांगर विकायला लक्ष्मणरावांना दोन वर्षें लागलीं. त्यापासून त्यांनीं जो धडा घेतला तोच कंपनीच्या विक्रीच्या पद्धतीचा पाया आहे. "शेतकरी हा कांहीं मूर्ख नाहीं; मात्र त्याला पटवून द्यायला हवें." जुन्या चरकापेक्षा आपला नवा चरक अधिक रस गाळतो, हें शेतकऱ्यांना दाखवून देण्यासाठी किर्लोस्करांनीं जुन्या चरकांतून बाहेर पडलेल्या उसाच्या चोयऱ्या आपल्या नव्या चरकांत घालून भरपूर रस काढून दाखविला."

पुण्यांतील आपल्या कारखान्याच्या कॉन्फरन्स हॉलमध्यें आपल्या कामगारांसमवेत अनवाणी पायांनीं, कपाळाला शुभदायक कुंकुमतिलक लावून लक्ष्मीपूजन करणारे शंतनुराव तडक अमेरिका, कॅनडा आणि सात लॅटिन अमेरिकन शहरें ह्यांच्या तुफानी दौऱ्यावर आमच्या भरभराटींत असलेल्या कारखान्यांना नव्या बाजारपेठा मिळवून देण्यासाठी कसे निघाले, ह्याचें "टाइम"नें केलेलें वर्णन किर्लोस्करांनीं बैलापासून अत्याधुनिक यंत्रांपर्यंत केलेल्या घोडदौडीला साजेसेंच आहे.

### चहाचें उत्पादन वाढण्याचा संभव

भारतामधील चहाचें उत्पादन ह्या वर्षी गेल्या वर्षाच्या मानानें बरेंच अधिक होण्याचा संभव दिसत आहे. गेलीं दोन वर्षें चहाच्या मळ्यांना फारशीं चांगलीं गेलीं नाहींत. ह्याला कारण मुख्यत: प्रतिकूल हवामान झालें. परंतु ह्या वर्षी अनुकूल हवामानामुळें उत्पादनांत चांगली भर पडण्याचीं लक्षणें दिसत आहेत. ईशान्य भारतामधील चहाच्या मळ्यांचें १९६३ सालच्या जानेवारी ते जुलै ह्या महिन्यांतील उत्पादन ८·८२ कोटी किलोग्रॅम्स झालें होतें. १९६४ च्या ह्याच कालखंडांत सुमारें १० कोटी किलोग्रॅम्सचें उत्पादन झालें आहे. म्हणजे उत्पादनांत १·२ कोटी किलोग्रॅम्सची वाढ झालेला आहे. दक्षिण भारतामधील १९६४ सालाच्या पहिल्या तीन महिन्यांतील उत्पादन १९६३ मधील ह्याच कालांतील उत्पादनाच्या मानानें मागें पडलेलें होतें. परंतु त्यानंतर उत्पादनांत वाढ होऊं लागली असून वर्षाच्या उरलेल्या भागांत तें मागील वर्षापेक्षा अधिक होईल असा अंदाज आहे. टी बोर्डाच्या अध्यक्षांनीं असा अंदाज केला आहे कीं, चालू वर्षी भारतामधील चहाचें उत्पादन ८० कोटी पौंड अथवा ३६·३ कोटी किलोग्रॅम्स इतकें होईल. अंदाजाप्रमाणें उत्पादन वाढल्यास १९६३ च्या उत्पादनापेक्षा तें ४ कोटी पौंडांनीं अथवा १·८ किलोग्रॅम्सनीं वाढलें असें होईल. १९६५ सालीं तर चहाचें उत्पादन आणखी ३ कोटी पौंडांनीं वाढेल असाहि अंदाज त्यांनीं केला आहे. चहाच्या निर्यातींत मात्र घट झालेली आहे. १९६३ च्या जानेवारी–जुलै ह्या कालांत ९·२ कोटी किलोग्रॅम्स चहा निर्यात करण्यांत आला होता. १९६४ च्या ह्याच कालांत ७·५ कोटी किलोग्रॅम्स चहा निर्यात करण्यांत आला. गेल्या दोन वर्षांत चहाचें उत्पादनच कमी झाल्यानें निर्यातीसाठी लागणारा चहाच पुरेसा उपलब्ध नव्हता असें कारण सांगण्यांत येत आहे.

### भारत आणि संयुक्त अरब प्रजासत्ताक ह्यांमधील व्यापार

भारत आणि संयुक्त अरब प्रजासत्ताक ह्या देशांनीं परस्परांमधील व्यापार चालू वर्षी दुप्पट करण्याचें ठरविलें आहे. त्याचप्रमाणें उभयता देशांनीं संयुक्तरीत्या कारखाने काढण्याचाहि निर्णय घेतला आहे. कांहीं निवडक क्षेत्रांत आर्थिक, तांत्रिक आणि औद्योगिक सहकार्य करण्याबाबतहि दोन्हीं देशांनीं मंजुरी दिली आहे. आशिआ आणि आफ्रिका ह्या खंडांतील अप्रगत देशांमध्यें वाढत्या प्रमाणावर होऊं शकणाऱ्या औद्योगिक सहकार्याची ही नांदीच समजण्यांत येत आहे. संयुक्त अरब प्रजासत्ताकानें अशा प्रकारच्या सहकार्यांत टाकलेलें हें पहिलेंच पाऊल आहे. प्रजासत्ताकांत सार्वजनिक मालकीचा विभाग चांगला समर्थ झालेला आहे. पण ह्याचा अर्थ तेथें खाजगी कारखानदारी मुळींच नाहीं असा नाहीं. हे दोन्हीं विभाग भारताशीं सहकार्य करतील अशी अपेक्षा आहे. उभयता देशांत होणाऱ्या आर्थिक सहकार्यांत भारत प्रजासत्ताकाला खाणींची यंत्रसामग्री, सूत कांतण्याची यंत्रसामग्री, पोलादाच्या बांधकामासाठी लागणारें सामान, इत्यादि पुरविणार आहे. खताच्या व तलम सुताच्या निर्मितीबाबत उभयता देश संयुक्त प्रयत्न करणार आहेत. भारत प्रजासत्ताकाकडून चालू आर्थिक वर्षांत ६५ हजार टन तांदुळाची आणि १ लाख, २० हजार टन रॉक फॉस्फेटची आयात करणार आहे. प्रजासत्ताक भारताकडून ७·५ कोटी रुपयांचा चहा व ६ कोटी रुपयांचा तागाचा माल आयात करणार आहे. १९६३–६४ सालांत ह्या दोन देशांत २५ कोटी रुपयांच्या मालाची देवघेव झाली. १९६५-६६ सालांतील व्यापारी देवघेवीचें उद्दिष्ट डिसेंबरमध्यें ठरविण्यांत येणार आहे. औद्योगिक दृष्ट्या अविकसित देशांना एकमेकांचे प्रश्न सहज समजूं शकतात. त्या दृष्टीनें आर्थिक सहकार्याच्या ह्या प्रयत्नाला विशेष महत्त्व आहे.

प्रगतिचे ३० वें वर्ष

हे लक्ष्मीचे नवदेवालय
इथे श्रमांचा सुफलित संचय
उद्योगाचे उगमस्थान हे,
सौख्याचे संचित !
इथे हो सर्वांचे स्वागत !
बँक ऑफ महाराष्ट्र लि.
तुमची जिल्ह्याल्याची बँक
आपल्या ९१ शाखांनिशीं तुमच्या सेवेस सिद्ध

## भारताला मदत देण्याबाबत सूचना

अमेरिकेंतील अध्यक्षपदासाठीं नुकतीच निवडणूक झाला. ह्या निवडणुकींत डेमोक्रॅटिक पक्षातर्फे उपाध्यक्षपदासाठी सिनेटर हंफ्रे हे निवडून आले. सिनेटर हंफ्रे ह्यांनीं आग्नेय आशिआंतील घडामोडींविषयीं आणि त्यांत भारताला असणाऱ्या स्थानाविषयीं आपले विचार 'न्यूयॉर्क टाइम्स' ह्या वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतींत व्यक्त केले आहेत. ते म्हणतात, कीं भारताचे पंतप्रधान नेहरू ह्यांच्या मृत्यूमुळें आणि तेथें सध्यां असलेल्या अन्नधान्याच्या टंचाईमुळें एखादी खेदजनक घटना घडून येण्यापूर्वीच, अमेरिकेनें भारतास अधिक प्रमाणांत मदत पोचती केली पाहिजे. आग्नेय आशिआंत अमेरिकेचें लक्ष इंडोचायनापुरतेंच मर्यादित ठेवून चालणार नाहीं. इंडोचायनांतील व्हिएटनामचा प्रश्न विषारी झाला आहेच. पण, कम्युनिझमपासून बचाव करावयाचा असेल तर अमेरिकेनें भारत व पाकिस्तान ह्यांच्यांतील परिस्थितीकडेहि सतत लक्ष ठेवलें पाहिजे. आग्नेय आशिआंतील कम्युनिझमच्या प्रसाराला पायबंद घालण्यासाठी भारताभोंवतीं निर्माण केलेली अनेक देशांची एक संयुक्त संघटनाच उभारली गेली पाहिजे. आशिआंतील देशांचा राजकीय भवितव्याचा विचार करतांना ४० कोटी लोकसंख्या असलेल्या भारताचा विचार करणें फार महत्त्वाचें आहे. भारतांत अराजक माजूं न देतां, तो देश आशिआंतील पुढारीपण पेलण्यास समर्थ कसा करतां येईल, तें पहाणें अगत्याचें आहे. आशिआंतील भारताचें स्थान, अमेरिकेच्या भारतापासून अपेक्षा, आणि भारत स्वतः काय करूं शकेल, ह्या प्रश्नांची चांगली छाननी झाली पाहिजे. अमेरिका अनेक छोट्या मागासलेल्या देशांना मदत करते; पण ही मदत व भारताला द्यावयाची मदत एकाच मापानें मोजणें चुकीचें ठरेल. दुर्दैवानें अशी गैरलागू तुलना करण्याची संवय अमेरिकेंत अनेक ठिकाणीं दिसून येते.

## साखरेच्या कारखान्यांवर धान्यटंचाईचा परिणाम

महाराष्ट्रांतील अन्नधान्याच्या तीव्र टंचाईमुळें साखरेच्या कारखान्यांपुढें नवीनच प्रश्न उभा राहिला आहे. गळिताचा हंगाम सुरू झाला कीं कारखान्यांच्या परिसरांत काम करणारे हजारो हंगामी मजूर बाहेरून येत असतात. पण, यंदा ह्या हंगामी मजुरांना धान्य पुरविण्याची पंचाईत पडली असल्यामुळें कारखान्यांचा गळिताचा हंगाम उशिरां सुरू करावा लागणार अशीं चिन्हें दिसत आहेत. महाराष्ट्रांत खाजगी मालकीचे व सहकारी मिळून ३२ साखर कारखाने आहेत. त्यांपैकीं तीन कारखान्यांनीं तर हंगाम उशिरां सुरू करण्याचें ठरविलें आहेच. कारखाने उशिरां सुरू झाले तर साखर कमी निर्माण होणार हें ओघानेंच आलें. ह्यासंबंधींचा अंदाज असा आहे कीं, गळिताचा हंगाम १५ दिवस उशिरां सुरू झाल्यास सुमारें २० हजार टन साखरेची पैदास कमी होते. महाराष्ट्रांत उसाखालीं सुमारें ३ लाख, ४२ हजार एकर जमीन आहे. आणि उसाची निर्मिति अंदाजें १ कोटी, ७७ हजार टनापर्यंत होते. १९६२–६३ सालीं खाजगी मालकीच्या कारखान्यांनीं २.४३ लाख टन साखरेचें उत्पादन केलें होतें. परंतु १९६३–६४ च्या हंगामांत उत्पादन घटून २.०४ लाख टनच झालें. कारखान्यांच्या गळिताच्या शक्तीला पुरेसा ऊंस मिळण्याची खात्री नसतांनाच ऊंस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांचा व बागाइतदारांची गूळ करण्याकडे प्रवृत्ति वाढत आहे. कारण गुळाला कित्येक वर्षांत नव्हता इतका भाव अलीकडे मिळत आहे. महाराष्ट्रांतील ह्या भरभराटीला आलेल्या धंद्याला विलक्षण अडचणीच्या परिस्थितीला तोंड द्यावें लागणार आहे.

## चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत रोजगारीवर भर हवा

चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाचा कच्चा मसुदा तयार करण्याचें काम सध्यां नियोजनसमिति करीत आहे. हा मसुदा तयार झाल्यावर तो बहुधा पुढील महिन्याच्या अखेरीस राष्ट्रीय विकास मंडळाला सादर करण्यांत येईल. नियोजन समितीचे एक सभासद श्रीमन्नारायण ह्यांनीं कार्यक्रमाविषयीं आपले विचार एका लेखांत व्यक्त केले आहेत. ते म्हणतात कीं ह्या कार्यक्रमांत जास्तींत जास्त रोजगार उपलब्ध करून देण्यावर आणि अन्न, वस्त्र, घरें, शिक्षण आणि आरोग्य ह्यासंबंधीं किमान पातळी गांठण्याच्या प्रयत्नावर जोर देण्यांत आला पाहिजे. चौथ्या व पांचव्या पंचवार्षिक कार्यक्रमांत मिळून लोकांना राहणीचा किमान दर्जा प्राप्त करून देऊन, त्यांना देण्यांत आलेलीं आश्वासनें कृतींत उतरविलीं जातात कीं नाहीं ह्यावर त्यांचें यशापयश अवलंबून आहे. पांचव्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस प्रत्येक कुटुंबाला दरमहा १०० रुपयांचें उत्पन्न मिळवून द्यावयाचें असेल तर त्यासाठी आतांपासून एकसारखे काबाडकष्ट करण्यांत आले पाहिजेत; एरव्हीं हे साध्य होणार नाहीं. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ३.५ कोटी रोजगार उपलब्ध करून देण्याची जरूरी आहे. त्यांपैकीं १.२ कोटी रोजगार ४ थ्या कार्यक्रमाच्या प्रारंभीं बेकार असलेल्या लोकांसाठी लागतील, आणि २.३ कोटी नोकऱ्या मजूर बाजारांत नव्यानेंच दाखल झालेल्या लोकांसाठी लागतील. हे साध्य करण्यासाठी शेतीच्या व्यवसायांत विविधता आणली गेली पाहिजे. ग्रामीण भागांतील लोकांना अपुरा रोजगार मिळतो. त्यांना पूर्ण व उत्पादक रोजगारी देण्यासाठी ग्रामीण भागांत छोट्या उद्योगधंद्यांचें जाळेंच निर्माण करण्यांत आलें पाहिजे. तरच हा प्रश्न सुटण्याची शक्यता आहे.

## भारतांत तोंडामधील कॅन्सर अधिक प्रमाणांत

जागतिक आरोग्य संघटनेच्या सूचनेप्रमाणें भारतामधील कॅन्सर ह्या रोगाचा अभ्यास दोघां डॉक्टरांनीं केला आहे. त्यांपैकीं डॉ. माल्कम मुइर हे सिंगापूर येथील जनरल हॉस्पिटलचे प्रमुख असून डॉ. हिरामाया हे जपानच्या आरोग्यखात्यांत अधिकारी आहेत. त्यांनीं भारतांतील कॅन्सरच्या रोग्यांची पाहणी करण्यासाठी अड्यार येथील कॅन्सर इन्स्टिट्यूट ह्या संस्थेचें साह्य घेऊन तपासणी केली. भारतांत तोंडाचा आणि फुप्फुसाचा कॅन्सर अधिक प्रमाणांत आढळून येतो आणि त्याचें कारण पान खाण्याची आणि सिगारेटस् ओढण्याची लोकांना लागलेली संवय, असें मत त्यांनीं व्यक्त केलें आहे. त्यांच्या मतानें कॅन्सर हा रोग असाध्य असा नाहीं; परंतु त्यावर उपचार करण्यासाठी डॉक्टरांचा सल्ला लवकर घेतला पाहिजे. साधारणपणें कॅन्सरचा रोग झालेल्या लोकांपैकी एक तृतीयांश लोक बरे होतात असा अनुभव आहे. इतर देशांतहि कॅन्सरची बाधा झालेले रोगी आहेत. परंतु त्यांच्यांत तोंडांतील कॅन्सर झालेल्या रोग्यांची संख्या बरीच कमी असते. इतर देशांच्या मानानें तोंडांतील अगर फुफुसांतील कॅन्सर झालेल्या रोग्यांची भारतामधील संख्या ५० ते ६० पटीनें अधिक आहे. भारतांत पानाबरोबर तंबाखू चघळण्याची संवय पुष्कळांना असते. त्याचाच हा परिणाम असावा असें निश्चितपणें सांगतां येण्यासारखा पुरावा आहे. डॉक्टरद्वय आपल्या पाहणीचा अहवाल भारत सरकारला सादर करणार आहे. त्यावर योग्य तो निर्णय सरकारनें घ्यावयाचा आहे. तंबाखूच्या सेवनानें कॅन्सर होतो असा निर्णय अमेरिकन सरकारच्या शास्त्रज्ञांनींहि दिला आहे. आरोग्यास घातक असलेल्या तंबाखूच्या सेवनापासून लोक मोठ्या प्रमाणावर परावृत्त झाले तर तंबाखूची शेती व सिगारेटसूचे कारखाने ह्यांच्यावर विपरीत परिणाम होईल.

## पं. नेहरू स्मारक निधीचा विनियोग

### पंडितजींचें स्मारक प्रभावी कसें होईल ?

भारताचे अखिल जागतिक कीर्तीचे थोर देशभक्त पंडित जवाहिरलाल नेहरू यांचें स्मारकानिमित्त ठिकठिकाणीं मोठा निधि जमविण्याचें कार्य भारतामध्यें सध्यां चालूं आहे. या निधींतून स्मारकें उभारण्यांत येणार आहेत.

**खेड्यापर्यंत स्मारकाचें लोण**

स्मारकाचें हें लोण लहान खेड्यापर्यंतहि पोहोंचण्याची योजना झाल्यास तें एक पंडित नेहरूंच्या स्मारकाचें मोठेंच कार्य होईल. सध्यांची अन्नधान्याची परिस्थिति लक्षांत घेतां महाराष्ट्रासंबंधानें विचार करतां या निधींतून द्रव्यसाहाय्य खेडेगांवाकडे वळल्यास त्यामुळें होणारें कार्य पंडित नेहरूंचें खेडेगांवाच्या **सुधारणा संबंधाचें स्मारक** होऊं शकेल.

**महाराष्ट्रांतील शेती**

महाराष्ट्रांतील सव्वीस जिल्ह्यांमध्यें सुमारें छत्तीस हजार खेडीं आहेत. महाराष्ट्रांतील शेती प्रामुख्यानें पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्यामुळें ही पावसावरची शेती म्हणजे एक प्रकारच्या **जुगारासारखी** होय.

शेतीच्या धंद्याला स्थिरता आणण्याकरतां शक्य तितकी पाणी-पुरवठ्याच्या व्यवस्थेची आवश्यकता आहे. हें काम प्रत्येक गांवच्या गांवकऱ्यांकडून सहकारितेनें व स्थानिक श्रमदानानें होण्याकरितां त्यांस उत्तेजनार्थ मदत, स्मारकानिमित्त जमणाऱ्या निधींतून योग्य प्रकारें व योग्य मार्गानें झाल्यास एक मोठेंच देशकार्य होऊं शकेल. यामुळें अन्नधान्याच्या उत्पादनाचें वाढीस बरीच मदत होऊन मोठेंच कार्य होईल.

**कामाची दिशा**

या कार्यक्रमाची आखणी पद्धतशीर व शास्त्रीय दृष्टीनें होण्याची आवश्यकता मात्र आहे. महाराष्ट्रामध्यें पावसाचें मान ठिकठिकाणीं कमीजास्त प्रमाणांत व अनियमित असतें. याकरितां पडणाऱ्या पावसाचें पाणी व्यर्थ मोकाट न जाऊं देतां त्याचा उपयोग कसा करून घेतां येईल याकडे लक्ष देणें जरूर आहे.

**गांवच्या शिवाराची पाहणी.** याकरितां गांवच्या सबंध शिवाराची पाहणी होण्याची जरूरी आहे. या पाहणीमुळें एकंदर भू-रचना लक्षांत आल्यानंतर योग्य तो कार्यक्रम हातीं घेणें सोपें व सोईचें होईल.

**(१) जमिनीस ताली घालणें.**

जमिनीस समपातळीवर ताली घालणें. हें काम सर्वांच्या सहकारितेनें व्हावें लागतें. तालीमुळें पावसाचें पाणी जमिनीवरून मोकाट वाहून न जातां जमिनींत मुरल्यानें ओलावा राहतो व तो पिकांच्या उपयोगी पडतो. ताली शास्त्रीय रीत्या पद्धतशीर घातल्यानें, जास्त पाणी काढून देण्याची सोयहि करतां येते. तालीमुळें शेतावरील माती वाहून जाऊन शेतीचा नाश होण्याचें थांबतें व पावसाच्या पाण्याचा पूर्ण फायदाहि मिळतो.

हे ताली घालण्याचें काम, गांवच्या लोकांच्या सहकारितेनें व श्रमदानानें योग्य मोबदला व प्रोत्साहन देऊन करावयाचें असतें.

**(२) ओढ्या व नाल्यास बंधारे**

गांवच्या शिवारांतून वाहणारे लहान ओढे व नाले यांस ठिकठिकाणीं लहान लहान बांध अगर बंधारे घालण्यानें त्यांतून पावसाचें पाणी एकदम निघून न जातां थांबत थांबत जाते व पाण्याचा सांठाहि ठिकठिकाणीं राहतो. त्यामुळें आजूबाजूच्या विहिरींस या पाण्याचा फायदा मिळून त्यांत पाणी राहतें. त्यामुळें भर उन्हाळ्यांत पिण्याच्या पाण्याचे हाल कमी होतात. विहिरींस पाण्याचा पुरवठा झाल्यामुळें बागायत शेतींत वाढ होऊन पिकांचें उत्पन्नांतहि वाढ होते.

**३. पाझर तलाव**

वरील दोन प्रकारच्या पावसाच्या पाण्याच्या उपयोगाच्या व बचतीच्या साधनाशिवाय तिसरें साधन म्हणजे गांवच्या शिवाराची पाहणी करून पाणी सांठविण्याची योजना करणें हें होय. गांवच्या जवळच्या टेकडीवरून वाहणारें पाणी उताराची जागा पाहून त्या ठिकाणीं एक लहानशी भिंत किंवा बंधारा घालून पाणी अडवून तेथें पाण्याचा संचय करणें हें होय. यास पाझर तलाव असें म्हणतात. या तलावामुळेंहि आजूबाजूच्या विहिरींस पाझरामुळें पाण्याचा पुरवठा होऊं शकतो.

वरील तीन प्रकारच्या साधनांनीं सर्वसाधारणपणें कमी व अनिश्चित पाऊस पडणाऱ्या महाराष्ट्रांतील भागांत पिकें हातांत पडण्याची बरीच निश्चिती निर्माण होऊं शकेल. हीं सर्व कामें गांवकऱ्यांनीं एकदिलानें करण्याकरितां प्रोत्साहनादाखल पंडित नेहरू स्मारक निधींतून द्रव्यसाहाय्य मिळाल्यास खेडेगांवींहि पंडित नेहरूंचें एक प्रकारचें **प्रभावी स्मारक** होऊं शकेल.

**वा. कृ. कोगेकर.**

---

**रशिआला पाठविण्यांत येणारा चामड्याचा माल**

रशिआहून भारताला एक व्यापार प्रतिनिधि मंडळ आलें असून त्याचा दौरा सध्यां चालूं आहे. रशिअन प्रतिनिधि मंडळाचें नेतृत्व रशिआच्या परराष्ट्रीय व्यापार खात्याच्या उपमंत्र्याकडे आहे. भारत आणि रशिआ ह्यांच्यांतील व्यापार वाढविण्याचे प्रयत्न उभयता देश करीत आहेत. त्या प्रयत्नांचाच एक भाग म्हणून हा दौरा आखण्यांत आला आहे. भारताकडून रशिआला निर्यात होणाऱ्या मालांत चामड्याच्या मालाचा अंतर्भाव आहे. ह्या मालाची निर्यात वाढविण्याच्या दृष्टीनें भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापार खात्याचे मंत्री श्री. मनुभाई शहा ह्यांनीं अशी सूचना केली आहे कीं, भारतामधील चामड्याच्या धंद्याचे कांहीं तंत्रज्ञ रशिआला पाठविण्यांत यावेत; रशिआला कोणत्या प्रकारच्या व कोणत्या दर्जाच्या मालाची जरुरी आहे ह्याचा त्यांनीं अभ्यास करावा म्हणजे त्याप्रमाणें भारताला माल तयार करणें सोपें जाईल. चामड्याच्या मालाची निर्यात वाढविण्यासाठी जें मंडळ काम करीत आहे त्याच्या अध्यक्षांची व रशिआच्या व्यापार खात्याच्या उपमंत्र्यांची दिल्ली येथें भेटहि घडवून आणण्यांत आली. निर्यात मंडळाचे अध्यक्ष ह्यासंबंधीं बोलतांना म्हणाले कीं, कोणत्याहि गिऱ्हाइकाच्या गरजेप्रमाणें माल तयार करून देण्याची भारताचा तयारी आहे. मात्र मालासाठीं योग्य ती किंमत देण्याची तयारी गिऱ्हाइकानें दाखविली पाहिजे. रशिआला माल पुरविण्याच्या बाबतींत भारताच्या कांहीं अडचणी आहेत. त्यांत वाजवी किंमती मिळण्याचाहि प्रश्न आहे. रशिअन व्यापारी प्रतिनिधि मंडळाच्या नेत्यानें भारताच्या अडचणींचा विचार करण्याचें आश्वासन दिलें आहे. भारतातर्फे आश्वासनाबद्दल समाधान व्यक्त करण्यांत आलें.

---

**फ्रेंच मुलांना देणगी**—पॅरिसमध्यें पं. नेहरूंच्या जन्मदिनाचा समारंभ साजरा करण्यांत आला. ह्या प्रसंगाच्या निमित्तानें भारतीय मुलांनीं रंगविलेल्या कांहीं चित्रकृति फ्रेंच मुलांना देणगी म्हणून देण्यांत आल्या. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सांस्कृतिक उपसंघटनेच्या प्रमुखानें चित्रांचा स्वीकार केला. चित्रें नंतर निवडक फ्रेंच शाळांना भेटीदाखल देण्यांत येतील.

### कॅन्सरवरील नवीन वनस्पतीजन्य औषध

कॅन्सर हा रोग मृत्यूचें आमंत्रण आहे असें मानण्यांत येतें. ह्या रोगावरील खात्रीचा उपाय शोधून काढण्याचे प्रयत्न सर्व जगभर करण्यांत येत आहेत. स्वित्झरलंडमधील एका वैद्यकीय संशोधन-संस्थेनें वनस्पतीचा उपयोग करून ह्या कर्क रोगावर एक नवें औषध शोधून काढलें आहे. ह्या औषधासाठी लागणारें द्रव्य, वनस्पती-पासून अलग करण्यांत आलें आहे. हिमालयांतील कांहीं अत्युच्च ठिकाणीं ह्या वनस्पतीचा आढळ होतो. ह्याच वनस्पतीची आणखी एका प्रकारची जात पूर्व अमेरिकेंतहि सांपडल्याचें वृत्त आहे. हिमालयांत अनेक प्रकारच्या औषधी वनस्पती सांपडतात, हें महशूरच आहे. वास्तविक कर्क रोगावरील उपचारासाठी उपयुक्त असणारी ही वनस्पती १८८९ सालापासून वैद्यकीय जगताला परि-चित आहे. पण, त्या वनस्पतीसंबंधीं अधिक संशोधन होण्याचें राहून गेलें. गेलीं १० वर्षे स्वित्झरलंडमधील एका संशोधन-संस्थेनें हें काम हातीं घेतलें आणि आतां त्यापासून फलनिष्पत्ति होऊं लागली आहे. नवीन औषधानें छातीच्या आंतड्याच्या, चामडीच्या आणि जिभेच्या कॅन्सरवर परिणामकारी इलाज करतां येतो असें आढळून आलें आहे. अशा प्रकारचा कॅन्सरचा रोग जडलेल्यांच्या आरोग्यांत बरीच सुधारणा नवीन औषधानें होते. अजून ह्या औषधासंबंधीं संशोधन चालू आहे आणि त्याचें स्वरूप बरेंच गुंता-गुंतीचें आहे. युरोपांत व अमेरिकेंत नव्या औषधाची विक्री चालू झालेली आहे. भारतांतहि एकदोन वर्षांत तें उपलब्ध होईल अशी अपेक्षा आहे. कॅन्सर ह्या रोगावर हमखास उपाय अद्याप सांपडला नसला तरी रोग्याच्या यातना कमी करणारें औषधहि स्वागतार्हच म्हटलें पाहिजे. मृत्यूच्या अनिवार्य आपत्तींतहि दिलासा देणारें औषध कमी महत्त्वाचें मानण्याचें कारण नाहीं.

### रशिआ व चीन ह्यांच्यांतील मतभेद मूलभूत स्वरूपाचें

रशिअन क्रांतींत भाग घेतलेले अनेक सोव्हिएट पुढारी आतां कालाच्या उदरांत गडप झाले आहेत, किंवा राजकीयदृष्ट्या मृतवत् जीवन जगत आहेत. स्टॅलिननंतर रशिआचे मुख्य प्रधान म्हणून आणि रशिअन कम्युनिस्ट पक्षाचे पहिले चिटणीस म्हणून मि. क्रुश्चॉव्ह ह्यांनीं एकमेवाद्वितीय स्थान पटकावलें होतें. अलीकडे ते स्थानभ्रष्ट झाले असले तरी भिन्न विचारसरणीच्या राष्ट्रांनीं एकमेकांशीं सहिष्णुतेनें वागून जगाला शांततामय जीवनाचा लाभ घ्यावा ह्या विचाराचे एक प्रमुख प्रेरक म्हणून त्यांचें नांव कायमचें स्मरणांत राहील. रशिआच्या राज्यकारभाराचीं सूत्रें आतां ज्यांच्या हातीं आलीं आहेत त्यांच्या व मि. क्रुश्चॉव्ह ह्यांच्या धोरणांत फारसा फरक नाहीं असें नव्या नेत्यांनीं केलेल्या अनेक वक्तव्या-वरून दिसून येतें. रशिआचे पंतप्रधान आणि कम्युनिस्ट पक्षाचे चिटणीस हीं दोन्ही स्थानें एकाच व्यक्तीच्या ठिकाणीं एकवट-ण्याची प्रथा नव्या रशिअन नेत्यांनीं बंद केलेली दिसून येते, ही गोष्टहि महत्त्वाची आहे. रशिआ व चीन ह्यांच्यांतील मतभेद मूलभूत स्वरूपाचे असल्यामुळें शांततामय सहजीवनाच्या धोरणाला सुरुंग लावण्याचा प्रयत्न चीनकडून झाल्यास त्याला रशिआचा पाठिंबा मिळेल असें वाटत नाहीं. शांततामय सहजीवनाचा पाया घालण्याच्या कामीं जागतिक पुढाऱ्यांना यश आल्यास मागास-लेल्या देशांना अधिक आर्थिक मदत देण्यासाठी त्यांचे हात मोकळे होतील. तथापि हें नव्या पुढाऱ्यांवर अवलंबून आहे. १९६३ च्या नोव्हेंबरमध्यें मि. केनेडी व मेमध्यें पं. नेहरू दिवंगत झाले. त्यानंतर अगदीं अलीकडे मि. क्रुश्चॉव्ह ह्यांचा अस्त झाला. शांततामय सहजीवनाचा पुरस्कार करणारे जुने खंदे नेते आतां नसल्यामुळें ह्या प्रश्नाला नवें महत्त्व प्राप्त झालेलें आहे.

सरदारगृह

मुंबईंत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्यें व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

— आमचीं वैशिष्ट्यें —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचें भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोयी.
* टिळक जन्म-शताब्दी दिनीं लोकमान्यांचें सरदारगृहांत केलेलें स्मारक.


फोन नं. :-३८३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार-सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.




बेडेकर
मसाले, लोणचीं व पापड
आपल्या जेवणांत विशेष लज्जत आणतील.
वापरून पाहा.
गुरुभाट, मुंबई ४.
शाखा : ठाकुरद्वार, दादर, कोट व परळ.

श्री. वा. काळे ह्यांचीं
कौटुंबिक व सामाजिक जीवनावरील पुस्तकें
१ कण आणि क्षण, २ पुढें पाऊल,
३ तुमचें स्थान कोणतें ?

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES



Make doubly sure by fitting

GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA

MANUFACTURERS OF
MACHINE SPARE PARTS & TOOLS



शीतल, झुळझुळीत,
आणि वापरायला
अत्यंत मनोरम व सुखद

**ठाकरसी**
फॅब्रिक्स
फॅशनसाठी सर्वोत्तम पसंती

या कापडावर असें लेबल असतें
SANFORIZED

THACKERSEY FABRICS

ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स
- धी हिंदुस्तान स्पिनिंग अ‍ॅण्ड वीव्हिंग मिल्स कंपनी लिमिटेड
- धी क्राउन स्पिनिंग अ‍ॅण्ड मॅन्यु. कंपनी लिमिटेड
- धी इंडियन मॅन्युफॅक्चरिंग कंपनी लिमिटेड

**वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

स्थापना : १९४५ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७२९००


**बचतीच्या आकर्षक योजना**

| | |
|---|---|
| ( १ ) स्पेशल सेव्हिंग | व्याजाचा दर ३॥ टक्के |
| ( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत | " ३। " |
| ( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें | " ५ " |


*मुदतीच्या आकर्षक दरासंबंधीं चौकशी करा.*

मॅनेजर—**ना. शं. कानिटकर**

महाराष्ट्र सरकारनें
तगाईवर मंजूर केलेले
**"विजय" नांगर**
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग




तसेंच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट
ड्राइव्ह व
डायरेक्ट
कपल्ड, शिवाय

बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट इ. इ.

**— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —**

विश्रामबाग – सांगली ( महाराष्ट्र )

*भारतातील प्रमुख नागरी सहकारी बँक!*

**सारस्वत**
**को-ऑपरेटिव्ह बँक लि.**
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.

| | | | |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ... | रु. | १० लाख |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | ... | रु. | १५ " |
| ठेवी | ... | रु. | ४१४ " |
| खेळतें भांडवल | ... | रु. | ४५० " |

शाखा : फोर्ट, दादर, माहीम, वरळी, वडाळा, पुणें व बेळगांव. **महिला शाखा :** सारस्वत बँक-गृह, निकदवरी लेन, मुंबई ४.



स्थापना १९१८

ALCO

**मा**धवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय.
विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

### मध्यप्रदेशांतील खाणींसाठी जपानची मदत

जपानमधील पोलादाच्या उद्योगधंद्यांचें प्रतिनिधिमंडळ सध्यां भारताच्या दौऱ्यावर आहे. मध्यप्रदेशांत नव्यानें सांपडलेल्या लोखंडाच्या खाणींचा विकास करण्यासाठी जपानकडून मदत मिळविण्याचा प्रयत्न चालू असून, प्रतिनिधिमंडळ त्यासंबंधानें भारताच्या राष्ट्रीय खनिज विकास-मंडळाबरोबर चर्चा करणार आहे. मध्यप्रदेशांत आढळून आलेल्या लोखंडाच्या खाणींचा विकास घडवून आणण्यासाठी सुमारें १७ कोटी रुपये खर्च येणार आहे. ओरिसामधील किरिबारु ह्या ठिकाणच्या लोखंडाच्या खाणींचा विकास घडवून आणण्यासाठी जपाननें दिलेल्या मोठ्या कर्जाचा विनियोग मध्यप्रदेशांतील खाणींसाठी करण्यास जपानची हरकत नसल्याचें भारताला कळविण्यांत आलें आहे. मध्यप्रदेशांतील खाणींत अद्ययावत् यंत्रसामग्री वापरण्यांत यावयाची आहे.

---

### दिल्ली शहरांत प्रवाश्यांसाठी नवें होटेल

मध्यवर्ती सरकारच्या बांधकाम खात्यानें दिल्लींत एका सोयी-स्कर ठिकाणीं परदेशीय प्रवाशांचीं राहण्याची सोय करण्यासाठी एक हजार खोल्या असलेलें होटेल बांधण्याचें ठरविलें आहे. ह्या हॉटेलमध्यें सर्व आधुनिक सुखसोयीं करण्यांत येणार आहेत. भारतामधील सर्वांत मोठें असें ते होईल. दिल्लींतील अशोक हॉटेलच्यापेक्षां त्याचा विस्तार तिप्पट असेल. दिल्लीखेरीज मुंबई, कलकत्ता, मद्रास व कानपूर ह्या ठिकाणींहि अशा प्रकारचीं हॉटेल्स बांधण्याचा सरकारचा विचार आहे. अर्थमंत्री श्री. कृष्णम्माचारी जपानला गेले असतांना तेथील सुसज्ज हॉटेल्स त्यांना फार आवडलीं. परदेशीय प्रवाश्यांची सरबराई करणारें असें हॉटेल बांधण्याची मूळ कल्पना त्यांचीच आहे.

---

### अन्नधान्याच्या उत्पादनांत मोठी तूट

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या अन्न व शेती उपसंघटनेची प्रादेशिक परिषद मॅनिला येथें भरली होती. ह्या परिषदेचें उद्घाटन करतांना संघटनेचे डायरेक्टर-जनरल श्री. बी. आर. सेन म्हणाले कीं आशिआंतील लोकसंख्येंत भरमसाठ वाढ होत असून अन्नधान्याच्या उत्पादनांत मात्र मोठी तूट झालेली आहे. लोकसंख्या आणि अन्नधान्याचें उत्पादन ह्यांच्या वाढींतील हें विषम प्रमाण असेंच चालू राहिलें तर चालू शतक संपण्यापूर्वीं एकट्या आशिआंतील लोकसंख्या जगांतील सध्यांच्या लोकसंख्येइतकी होईल. पूर्वीं कधींहि नव्हती इतकी बिकट परिस्थिति आज आशिआंतील देशासमोर उभी ठाकली आहे.

---

### पहारा नसलेलीं रेल्वेचीं फाटकें

भारतामधील रेल्वेरस्त्यावर अनेक ठिकाणीं रस्त्यावरील वाहतुकीसाठी फाटकें असतात. गाडी येण्याच्या सुमारास व नंतर कांहीं वेळ हीं फाटकें उघडण्यासाठी व बंद करण्यासाठी पहारेकरी ठेवावे लागतात. ह्यासाठी लागणारा खर्च राज्य सरकारांनीं कांहीं प्रमाणांत सोसावा अशी सूचना रेल्वे खात्यातर्फे करण्यांत आली होती. गुजरातखेरीज इतर राज्यांनीं ही सूचना स्वीकारण्याची तयारी दाखविली आहे. राज्य सरकारांनीं कायम व पुन्हा पुन्हा होणाऱ्या खर्चापैकीं ५० टक्के खर्च द्यावा किंवा कायम स्वरूपाचा खर्च करून पुन्हा पुन्हा येणाऱ्या खर्चाची जबाबदारी रेल्वे खात्यावर सोपवावी, अशा पर्यायी सूचना करण्यांत आल्या होत्या. ह्यासंबंधीं गुजरात सरकारशीं आणखी वाटाघाटी होणार आहेत.

---


## महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.

**मुंबई**

( दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित )

| : मुख्य कचेरी : | : विभागीय कचेरी |
|---|---|
| ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई–१ | महाल : नागपूर. |
| टेलिफोन नं. २५५४७४–७५, | तारेचा पत्ता : |
| २५६२१४ २५४७८१ | फार्मर बँक |

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरी, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखर कारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | ... | ४ कोटी ८४ लाख |
| गंगाजळी व फंड | ... | १ कोटी ४३ लाख |
| ठेवी | ... | ३५ कोटी १४ लाख |
| खेळतें भांडवल | ... | ७५ कोटी २५ लाख |

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

**: बृहन्मुंबईतील शाखा :**

( १ ) भायखळा ( २ ) गोरेगांव ( ३ ) खार ( ४ ) लालबाग ( ५ ) प्रभादेवी ( ६ ) विलेपार्लें ( ७ ) सांताक्रूझ ( ८ ) मुलुंड ( ९ ) चेंबूर (१०) माहीम ( ११ ) शीव ( १२ ) माटुंगा ( १३ ) अंधेरी.

वि. म. जोगळेकर,
जनरल मॅनेजर.



## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा

शेड्यूल्ड बँक

**हेड ऑफिस : चिरमुले निकेतन, सातारा शहर.**

टेलिफोन नं. ६४ ] स्थापना १९३६ [ तारेचा पत्ताः–युवर बँक

**—: वाढविलेले नवीन व्याजाचे दर :—**

सेव्हिंगज बँक:–३ टक्के

**मुदत ठेवी**

१ वर्ष–४¼ टक्के, २ वर्षें–४½ टक्के, ३ वर्षें–४¾ टक्के, ४ वर्षें–५ टक्के, ५ वर्षें–५¼ टक्के.

एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात. तसेंच, कंपलसरी सेव्हिंग्ज व क्युम्युलेटिव्ह ठेवीचे योजनेचा गिऱ्हाइकांनीं अवश्य फायदा घ्यावा.

**शाखा–विस्तार**

शाखा–१. मुंबई–फोर्ट, २. मुंबई–गिरगांव, ३ मुंबई–दादर, ४. मुंबई-डोंबिवली, ५. नाशिक, ६. पुणें, ७. बार्शी, ८. लोणंद, ९. कोल्हापूर, १०. कोल्हापूर–मार्केटयार्ड, ११. हलकर्णी, १२. इचलकरंजी, १३. फलटण, १४. अकलूज, १५. कराड, १६. कोरेगांव, १७. मसूर, १८. उंब्रज, १९. ओगलेवाडी, २०. करमाळा, २१. सातारा रोड. दि. ३१ १२–१९६३

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ११,९३,२५० |
| गंगाजळी | रु. | ६,५०,००० |
| ठेवी | रु. | ४,००,००,०००हून अधिक |
| खेळतें भांडवल | रु. | ४,५०,००,०००हून अधिक |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

| | |
|---|---|
| सी. ह. जोशी, | रा. ना. गोडबोले, |
| बी. ए., बी. कॉम., | बी. ए., बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी |
| जनरल मॅनेजर. | चेअरमन. |


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.